नियमित दिवाणी दावा क्र. ११/२०२१
भागिरथीबाई वि. उपविभागीय अधिकारी

**आदेश नि.क्र. २५ वर**

(CNR No. MHLA050002302021)

प्रतिवादी क्र.२ यांनी हा अर्ज दाखल करुन या प्रकरणी त्यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियत दावा चालवण्याचा आदेश रद्द करुन कैफियत स्वीकारण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर वादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींच्या वकिलांचे म्हणणे असे की, प्रतिवादींना वेळेत माहिती उपलब्ध न झाल्याने वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. प्रतिवादींनी जाणुनबुजून उशिर केलेला नाही. कैफियत दाखल करुन घेतल्यास वादीचे कांहीही नुकसान होणार नाही. वादीच्या वकिलाचे म्हणणे असे की, प्रतिवादींनी विलंबाचे संयुक्तिक कारण अर्जात नमुद केलेले नाही. कायदयाप्रमाणे निश्चित केलेल्या मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही.

४. सदरचा दावा हा स्थावर मालमत्तेशी निगडीत असल्याने त्यामधील वादीचे कायदेशीर हक्क ठरवण्यासाठी या दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींविरुध्द झालेला त्यांच्या कैफियतीविना दावा चालवण्याचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करुन घेतल्यास वादाचा पुर्णपणे निपटारा होण्यास मदत होणार आहे. यामध्ये वादीचे कांहीही नुकसान होणार नाही. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

प्रतिवादी क्र.२ यांच्या विरुध्द विनाकैफियत दावा चालवण्याचा झालेला आदेश रद्द केला आहे.

**(प्र. अ. सवदीकर)**

दि.२४/११/२०२१. दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

अहमदपूर.